## महिन्याचा विचार

मानवतेची सर्वश्रेष्ठ सेवा म्हणजे आपण जाताना आपल्यामागे स्वतःच्या अनेक प्रतिमा ठेवून जाणे ! या बाबतीत गुरुदेवांचा हात कोणी धरू शकणार नाही. तत्वज्ञ असलेले गुरुदेव अंगी चुंबकीय शक्ती बाळगून होते. सर्वप्रकारच्या धातूंना स्वतःकडे आकर्षित करून गुरुदेव त्या धातूंचे शुद्ध सुवर्णात रूपांतर करीत असत. कसे जमत असेल त्यांना हे ?

ते प्रत्येकावर साधुत्वाचा लेप चढवित असत. त्यांच्या सहवासात येणाऱ्यांच्या व्यक्तिमत्वातील दुर्गुण काढून टाकत गुरुदेव एखादी छोटीही चांगली गोष्ट उन्नत करून सांगत. ते कोणाचाही दुस्वास करीत नसत अथवा बोल लावत नसत. ते कोणाकडेही दुर्लक्ष करीत नसत. त्यांच्या मते पृथ्वीतलावर एकही दुष्ट व्यक्ती नव्हती आणि प्रत्येकामध्ये सद्गुणअसतात यांवर त्यांचा ठाम विश्वास होता. गुरुदेव कोणालाही निरुपयोगी मानत नसत. सर्वदूर ते ईश्वर आणि ईश्वरीतत्व बघत असत. त्यांच्या शरीरातील अद्भुत गतीतत्व



समोरच्या व्यक्तीमधील सुप्त सद्गुण जागृत करीत असत आणि त्यांना पाठबळ देत असत. बरेचदा लाभार्थ्यालाही याचा पत्ता नसे.

व्यक्तींना संत बनविण्याच्या या कार्यात गुरुदेवांसाठी कोणताही त्याग मोठा नसे. ते स्वतःला त्यासाठी बदलून घेत. समोरच्या व्यक्तीला फक्त या मूर्तीकामात स्वतःला गुरुदेवांच्या स्वाधीन करावे लागायचे. मग ती गुरुकृपा व्हायची. गुरुदेवांची सहनशीलता अनेकवेळा ताणली जायची. स्वतःला जन्मतः संत मानणारी समोरची व्यक्ती गुरुदेवांच्या हातातील छिनी-हातोड्याला विरोध करायची. लाडके मूल असे वागून वडिलांना कदाचित चीड आणू शकेल, पण गुरुदेव हातातील काम थोडावेळ थांबवत, त्या अजाण व्यक्तीवर प्रेमाचा शिडकावा करीत आणि त्याला शुद्धीवर येण्यासाठी वेळ देत.

क्वचित प्रसंगी या महापुरुषाच्या संरक्षक सावलीतून ती व्यक्ती निघूनही जाई. साधकाला गढवण्यात मग्न असलेले गुरुदेवअशा भरकटलेल्या,



अहंभावात बुडालेल्या आणि इतक्या संयमाने प्रयत्न केल्यावरही निघून गेलेल्या व्यक्तीबद्दल निरपेक्ष असत. अर्थात जडणघडणीचा मार्ग सहजी सोडण्यास त्यांचा विरोधच असायचा आणि त्यासाठी गुरुदेव काहीही करण्यास मागेपुढे पाहत नसत. कोणताही गुन्हा अथवा पाप असे नाही,ज्याला गुरुदेव माफ करीत नसत. किरकोळ कमतरतेमुळे अथवा दुर्बलतेमुळे एखादी व्यक्ती क्षणिक लोभाच्या मागे लागून जाणार असेल तर गुरुदेव ती गोष्ट स्वतःपुरवीत असत म्हणजे साधकाचे भविष्यात अधःपतन होणार नाही आणि कधीतरी स्वतःची चूक त्याच्या लक्षात येईल. मोक्षाच्या मार्गापासून दूर जाण्याची शक्यता असलेल्या साधकाला कसेही करून परतवत.

(क्रमशः )

**Sivananda's Integral Yoga**
**By Swami Venkatesananda**

❖ ❖ ❖

## दिव्य जीवन संघ, पुणे शाखा

### पंधरावी राज्यस्तरीय आंतरशालेय निबंध स्पर्धा २०२१

**विषय –**

१) देणे कोरोनाचे २) बोधिवृक्ष

३) संजीवन समाधी –७२५ वर्षे ४) स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव

**नियम–**

१) स्पर्धेत इ. ८वी ते १०वी तील विद्यार्थी भाग घेऊ शकतील. २) स्पर्धेसाठी प्रवेश फी नाही. ३) शाळेच्या मुख्याध्यापकांच्या पत्रासमवेत निबंध खालील पत्त्यावर **२० डिसेंबर २०२१** पर्यंत व्यक्तिशः (बाय हॅन्ड) अथवा स्पीड पोस्ट ने पाठवावेत.
(कृपया कुरियर नको)

**संयोजक,**
**पंधरावी राज्यस्तरीय आंतरशालेय निबंध स्पर्धा,**
**दिव्य जीवन संघ,**
**श्री. नीतिन देशपांडे**
**''ईशावास्य'' प्लॉट नं. ४९ सायंतारा कॉलनी,**
**डि.एस.के. विश्व, धायरी, पुणे ४११०६८**
**दूरध्वनी–९८५०९३१४१७**

४) शब्द मर्यादा ७५० शब्द ५) स्पर्धेतील सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात येईल. ६) विजेत्यांना मनीऑर्डरने शाळेच्या पत्त्यावर पारितोषिक पाठवण्यात येईल. स्पर्धेचा निर्णय सर्व सहभागी शाळांना **१ जानेवारी २०२२** रोजी कळविण्यात येईल. ७) स्पर्धा मराठीतून होणार असली तरी हिंदी अगर इंग्रजीतून विचार मांडले तरी चालतील. ८) परिक्षकांचा निर्णय अंतिम आणि सर्वांवर बंधनकारक असेल. ९) विद्यार्थ्याने आपला फोन नंबर / मोबाईल नंबर लिहावा.

**पारितोषिके–**

प्रथम पुरस्कार – ५०१ रू/–
व्दितीय पुरस्कार– २५१ रू./–
तृतीय पुरस्कार– १०१ रू/–
उत्तेजनार्थ (दोन) पुरस्कार – ५१रू/– प्रत्येकी



## दिव्य जीवन संघ, पुणे शाखा वृत्तांत

१) नोव्हेंबर महिन्याचा सत्संग १४ तारखेला संमिश्र (हायब्रीड) स्वरूपात झाला.

२) ''दिव्य जीवन'' या मासिक पत्रिकेचा अंक परिवारातील सदस्यांना पाठविण्यात आला.

### पुणे शाखेचा पत्ता

**डॉ. नितीन देशपांडे**
ईशावास्य /४९, सायंतारा कॉलनी
डी.एस .के. विश्व, धायरी,
पुणे –४११०६८
मो.नं. ९८५०९ ३१४१७

बुक पोस्ट

प्रति





# दिव्य जीवन



वर्ष १६/अंक १२
डिसेंबर २०२१

Do not waste this precious life in playing cards and idle gossiping. Give up hot debates and arguing.

Destroy all pleasure centres. Abandon the desire for comfort. Set fire to the fuel of lust. Destroy the fortress of egoism. Be quick, be quick, friend! Day and night sing:

**"Hare Rama Hare Rama Rama**
**Rama Hare Hare,**
**Hare Krishna Hare Krishna**
**Krishna Krishna Hare Hare."**

Now take a plunge in the ocean of bliss.

- Swami Sivananda